किंमत १० रुपये ● पृष्ठे १०४ ● मार्च २०१४ ● वर्ष ६ वे ● अंक १०

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

## लोकसभेची रणधुमाळी






बारामती येथे झालेल्या कुलगुरु व प्रथितयश शेतकऱ्यांच्या परिषदेत ना. शरद पवार यांनी केलेले भाषण...

# शेतकरी व कृषी शास्त्रज्ञांमधील परस्पर संवाद आता वाढायला हवा

## - केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांचे विचार

खासदार सौ. सुप्रिया सुळे, आयसीएआरचे महासंचालक डॉ. एस. एयप्पन, जैन इरिगेशनचे अध्यक्ष बी. एच. जैन, मराठवाडा शेती सहाय्य मंडळाचे विश्वस्त व्ही. एस. बोराडे, सर्व कुलगुरु, संचालक, शास्त्रज्ञ आणि सभ्य स्त्री-पुरुषहो,

भारताचे प्रथम नागरिक श्री. प्रणब मुखर्जी यांचे विचार ऐकण्याची संधी आपल्याला नुकतीच लाभली. आपल्या भविष्यकालीन वाटचालीत त्यांचे शब्द आपल्याला सदैव मार्गदर्शक ठरत राहतील अशी मला खात्री आहे. ते येथून गेल्यानंतरही आपण आपली येथील चर्चा पुढे चालू ठेवत आहोत कारण त्यामुळे भारतीय कृषीक्षेत्रातील सर्व अग्रगण्य व्यक्तींशी संवाद साधण्याची संधी सर्व शेतकरी व विद्यार्थ्यांना लाभणार आहे. कृषी क्षेत्रात असाधारण कामगिरी बजावणाऱ्या महाराष्ट्राच्या तीन सुपुत्रांचा गौरव करण्याचीही संधी यानिमित्ताने आपल्याला मिळत आहे. 'महिको'चे डॉ. बी. आर. बारवाले, जैन इरिगेशनचे श्री. भवरलाल जैन व मराठवाडा शेती सहाय्य मंडळाचे श्री. विजय बोराडे हे तीनजण असून त्यांचा वेगळा परिचय करुन देण्याची गरज आहेत. असे निदान मला तरी वाटत नाही.

प्रिय विद्यार्थी आणि शेतकरी बंधूंनो, भारतीय कृषीक्षेत्राने गेल्या काही काळात उत्पादन व उत्पादकता या दोन्ही बाबतीत जे लक्षणीय यश मिळविले आहे त्याची माहिती आपण नुकतीच ऐकली. परंतु सतत वाढत असलेली लोकसंख्या काही खाद्यान्नांच्या किंमतीतील मोठे चढ-उतार शेतीसाठी आवश्यक असलेल्या सर्वच गोष्टींवरचा वाढता खर्च, नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास, वीजेची कमतरता, हवामानातील बदल आणि शेतजमिनीचे (लँड होल्डिंग) सतत होत असलेले तुकडे यासारख्या अनेक कारणांमुळे आपल्या अन्नसुरक्षेवरील दबाव वाढत चालला आहे. यापुढील काळातही या आव्हानांचा आपल्याला त्रास होत राहणार आहे.

अर्थात त्यावर मात करायची तर उत्पादन आणि विक्री (मार्केटिंग) या दोन्ही आघाड्यांचा समन्वय साधणारी अधिक सुनियोजित धोरणे आपल्याला आखावी लागतील.

ज्यायोगे उत्पादक व ग्राहक यांच्याकडून होणाऱ्या मागणीची पूर्तता आपण योग्यप्रकारे करु शकू आणि मग अन्न, पौष्टिकता व उत्पन्न जनसामान्यांच्या रोजी-रोटीची सुरक्षाही साध्य होऊ शकेल. अन्नधान्य, बागायती पिके, पशुधन, मच्छीमारी व अन्य संलग्न क्षेत्रांतील उत्पादन व उत्पादकता वाढविण्यासाठी आपल्याला यापुढे योग्य ती तंत्रज्ञाने विकसित करावी लागणार आहेत.

कृषी क्षेत्रातील शिक्षण व संशोधनास गती व दिशा देणारी यंत्रणा आपण पूर्वीच उभारली असून त्याचे नेतृत्त्व इंडियन कौन्सील ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च (आयसीएआर) अतिशय समर्थपणे करीत आहे. सध्या या संस्थेच्या १०८ इन्स्टिट्युटस् देशाच्या काना-कोपऱ्यात काम करीत असून त्यांना ६९ कृषी विद्यापीठे व ६३७ कृषीविज्ञान केंद्रांकडून उत्तम साथ मिळत आहे. आपल्या देशातील कृषी व पर्यावरण व्यवस्थांमधील आणि पिके व अन्य वस्तुंमधील प्रचंड वैविध्य लक्षात घेता आता आपल्याला सर्व संबंधित घटकांमध्ये चांगला समन्वय व प्रभावी भागीदारीचे संबंध प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

**''कृषी क्षेत्रात होणारे संशोधन स्थानिक प्रश्नांच्या सोडवणुकीस प्राधान्य देणारे व शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञानाचे धडे देणारे असले पाहिजे. त्यासाठी शेतकरी, शास्त्रज्ञ व संलग्न क्षेत्रांतील सर्व कामगारांमध्ये मोठ्या प्रमाणात सहकार्याचे परस्पर संबंध निर्माण होणे अतीव गरजेचे आहे.**

शेतकरी वर्गाच्या स्थानिक प्रश्नांच्या सोडवणूकीस प्राधान्य देणारे आणि शेतकऱ्यांना सुधारित तंत्रज्ञाने व व्यवस्थापनाचे धडे देणारे कृषी संशोधन होण्यासाठी शेतकरी-शास्त्रज्ञ व संलग्न क्षेत्राची संबंधित सर्व कामगारांमध्ये आता अधिक मोठ्या प्रमाणात परस्पर संवाद झाला पाहिजे. त्याखेरीज स्थानिक प्रश्नांवर शेतकऱ्यांनी स्वतःच जे काही कल्पक उपाय शोधून काढले आहेत ते ही फार महत्त्वाचे असल्याने त्यांचा प्रचार अन्यत्र केला पाहिजे. या सर्व प्रक्रिया शास्त्रशुद्ध, अभिनव व कृषीविकासास सहाय्यक आहेत हे सिद्ध करण्यासाठी त्यांच्या व्यवस्थित लेखी नोंदी होणेही अतिव गरजेचे आहे.

यासंबंधात पुढाकार घेऊन आयसीएआरने 'फार्मर-फर्स्ट', 'स्टुडंट रेडी', 'एआरवायए' (आर्य) यासारखे अनेक अभिनव उपक्रम सुरु केले ही खरोखरच आनंदाची बाब आहे. कृषीसंशोधनास कल्पकता व एकात्मिकतेचे परिमाण लाभावे म्हणून 'ॲग्रिकल्चर टेक्नॉलॉजी फोरसाइट सेंटर' स्थापण्याचे त्यांचे पाऊलही

**महिको कंपनीचे अध्यक्ष बद्रीनारायण बारवाले यांचा सन्मानचिन्ह देऊन आयसीएआरतर्फे सत्कार करताना शरद पवार, शेजारी भवरलाल जैन, विजय बोराडे व सुप्रिया सुळे**



अतिशय स्तुत्य आहे. दरम्यान, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व शेतकऱ्यांदरम्यानचा परस्पर संवाद वाढविण्यासाठी कृषी विज्ञान केंद्रे प्रयत्नशील असून निवडक शेतकऱ्यांना 'आयटी किटस्' देण्याची त्यांची योजना, तंत्रज्ञानिक विकासप्रक्रियेत शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यास निश्चित सहाय्यक ठरेल.

आयसीएआरने आखलेल्या 'फार्मर फर्स्ट' हा नवा कार्यक्रम केवळ उत्पादन व उत्पादकता या विषयांपुरता मर्यादित नाही तर त्यात शेतकऱ्यांच्या गुंतागुंतीच्या विविध समस्यांवर शेतकरी व शास्त्रज्ञांचा अन्य सर्व 'स्टेकहोल्डर्स'शी थेट संवाद घडवून आणण्याची योजनाही अंतर्भूत आहे. या कार्यक्रमांमुळे तंत्रज्ञान विकास व त्याच्या कृषीक्षेत्रातील अंगिकारास चांगली चालना मिळणे अपेक्षित आहे.

कृषी विद्यापीठांचे कुलगुरु व आयसीएआरच्या संचालकांच्या उपस्थितीत आज येथे होणाऱ्या विचारमंथनामुळे आपल्या देशातील कृषी संशोधन व शिक्षणसंबंधी कार्यक्रमपत्रिकेस नवी दिशा व गती मिळेल, अशी मला खात्री आहे. तुम्ही सर्वांना तुमच्या भविष्यकालीन कार्यक्रमांसाठी माझ्या शुभेच्छा आहेत.




## विजय बोराडे यांचा इशारा

मराठवाडा सहाय्यक मंडळाचे प्रमुख विश्वस्त आणि राज्याच्या जलसंधारण परिषदेचे माजी कार्याध्यक्ष विजयअण्णा बोराडे यांचा या समारंभात श्री. शरद पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्यावेळी बोलताना श्री. बोराडे म्हणाले, ''मी आयुष्यभर लोकांना व शेतीला पाणी भूगर्भातून मिळावे आणि त्यासाठी पाणलोट क्षेत्र विकासाचा व जलसंधारणाचा कार्यक्रम प्रभावीपणे व प्राधान्याने राबविला जावा यासाठी आग्रही व प्रयत्नशील राहिलो. त्याकरिता आडगाव, कडवंची व अनेक ठिकाणी निरनिराळे प्रयोग केले, उपक्रम राबविले. हे प्रयोग अत्यंत यशस्वी झाल्यामुळे आज ती जलसंधारणाची उत्कृष्ट मॉडेल्स ठरली आहेत. मला आज तुम्हाला आवर्जून सांगायचे आहे की पाणी भविष्यात पाहिजे असेल तर मातीवर लक्ष द्यावे लागेल. मातीकडे दुर्लक्ष करून पाणी मिळू शकणार नाही. अनेक शास्त्रज्ञ सांगतात की पावसाची सरासरी कमी झालेली नाही. पण हवामान बदलामुळे निश्चित काही परिणाम झाले आहेत. त्याची फळे आपण आता भोगत आहोत. पडलेल्या पावसाचे योग्य रितीने व्यवस्थापन करून तो भूजलात साठवून ठेवला तर एक वर्षाचा पाऊस अडीच वर्षे पुरू शकतो असा आमचा अनुभव आहे. आम्ही अनेक तलाव, बंधारे केले पाणी साठविण्यासाठी, पण ज्या मातीमध्ये पाणी धरून ठेवण्याची मूळ मोठी क्षमता आहे तिच्याकडे मात्र दुर्लक्ष केले आहे. म्हणून दरवर्षी लाखो टन मातीची धूप होते आहे. हे देशाला परवडणारे नाही. माती वाचविण्यासाठी आता आपण सर्वांनी कटिबद्ध होऊन मोठा कार्यक्रम हाती घ्यायला हवा.''

**आपल्या देशाच्या कृषीक्षेत्रापुढे सध्या अनेक आव्हाने व समस्या उभ्या आहेत, परंतु जैवतंत्रज्ञान, नॅनो तंत्रज्ञान व सूक्ष्मजीव शास्त्र यांच्या माध्यमातून आपण सर्वंकष तंत्रज्ञानिक प्रगतीचा मार्ग चोखाळला तर त्या सर्वांवर आपण निश्चितपणे मात करू शकू.**

# नव्या तंत्रज्ञानांचा अंगिकार हाच कृषी क्षेत्रापुढील सर्व समस्यांवर उपाय

## - भवरलाल जैन यांचे प्रतिपादन



शरद पवारसाहेब, सुप्रिया, व्यासपीठावर व समोर बसलेले सर्व मान्यवर, आज सकाळपासून आपण येथे भारतीय कृषी क्षेत्रापुढील समस्यांसंबंधात खूप काही ऐकले आहे. त्यामुळे आता मी या समस्यांवर कशी मात करता येईल याचा ऊहापोह करणार आहे. माझ्या मते तरी, सर्व समस्या सोडविण्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे जैवतंत्रज्ञान. नॅनो तंत्रज्ञान व सूक्ष्मजीव शास्त्राच्या माध्यमातून सर्वंकष तंत्रज्ञानिक प्रगती घडवून आणणे आणि माहिती व दळणवळणाच्या इलेक्ट्रॉनिक व्यवस्थांचा स्विकार करणे हा होय. माझा स्वतःचा या सर्व गोष्टींवर विश्वास असून, त्या आपल्याला हमखास यश मिळवून देतील अशी मला पूर्ण खात्री आहे. सध्या तरी जैवतंत्रज्ञानाच्या अंगिकाराच्या बाबतीत औषध उद्योगाच्या तुलनेत आपली कृषी आघाडी खूप मागे आहे. खरे तर, त्यांच्या वापरास आपल्याकडे प्रचंड वाव आहे परंतु अन्न उत्पादनात जे सढळ हाताने वापरण्यासंबंधात बरीच मतमतांतरे व वाद असल्याने ते घडू मात्र शकत नाही.

अर्थात, दर एकरी कृषीउत्पादन वाढविण्यासाठी हायब्रीड बी-बियाणे विकसित करणे व वापरणे आणि क्लोनिंगसारख्या तंत्रांच्या मदतीने रोपण संबंधी सर्व साधनसामुग्रीत सुधारणा करणे आपल्याला सहजशक्य आहे. जेनेटिकली मोडिफाइड उत्पादनांबाबतचे वादंग बाजूला ठेवले तर आपल्याकडे एपिग जेनेटिक्सचा प्रसार अधिक वेगाने होऊ शकेल. यापुढील काळात कृषीक्षेत्राचे मूल्य व महत्त्व वाढविण्यात सूक्ष्मजीवशास्त्राची भूमिका खूप महत्त्वाची राहील, असेही मला वाटते. कृषीउत्पादन वाढविण्याची फार मोठी क्षमता सेंद्रिय मूलद्रव्यांमध्ये आहे.

खतांचे उत्पादन आणि वापर या दोन्ही बाबतीत नॅनो तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात बरीच वाढ होऊ शकते. इलेक्ट्रॉनिक्स साधनांचा योग्य उपयोग केला तर झाडे व रोपांना काय हवे हे आपण खुद्द त्यांच्याशी बोलूनच समजावून घेऊ शकू. कदाचित एखाद्या झाडाला अधिक नायट्रोजनची गरज असेल तर अन्य काहींना फॉस्फरसची! काही रोपांची पाने तहानलेली असतील तर ती अधिक पाण्याची मागणी करतील तर जेथे अधिक पाणी सोडले जात आहे तेथील रोपांना आता पाणी सोडणे थांबवा, असे आपल्याला सांगतील. पिकांची उत्पादनक्षमता पूर्णपणाने वापरली जाणाच्या दृष्टीने या सर्व गोष्टी अतिशय महत्त्वाच्या ठरू शकतात. त्यांच्या मदतीने आपण प्रत्येक रोपाची नेमकी गरज योग्यप्रकारे भागवू शकू. अर्थात माहिती

व दळणवळण तंत्रज्ञानांचा अंगिकार केला तरच आपल्याला हे सारे करणे शक्य होईल आणि मग आपल्या कृषीक्षेत्राचा सारा चेहरामोहराच बदलून जाईल. याखेरीज शेतकऱ्यांना बाजारपेठांशी जोडण्यासही ही तंत्रज्ञाने सहाय्यक ठरू शकतात. ती शेतकऱ्यांना हवामानातील संभाव्य बदल आणि शेतीच्या विविध कामासंबंधीची माहिती अगदी बसल्या जागी उपलब्ध करून देतील.

हातभारही लावेल.

अर्थात, यापुढील काळात जलव्यवस्थापनाचे तंत्रज्ञान आत्मसात केले तरच कृषी उद्योग व घरगुती वापर या तीन क्षेत्रांमध्ये पाण्याच्या वापराची जी स्पर्धा व संघर्ष सुरू आहे, त्यास आपण आळा घालू शकू. जमीन, खते, पीक संरक्षण, आर्थिक गुंतवणुकी आणि व्यवस्थापकीय कौशल्य या शेतीशी संबंधित सर्व घटकांची उपयोगिता वाढणे, न वाढणे




**जळगाव येथील जैन इरिगेशन उद्योग समुहाचे अध्यक्ष डॉ. भवरलाल जैन यांनी कृषीक्षेत्रात केलेल्या अतुलनीय कार्याबद्दल आयसीएआरतर्फे सन्मानचिन्ह, मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार सत्कार करताना, शेजारी खा. सुप्रियाताई सुळे व महिको कंपनीचे अध्यक्ष बद्रीनारायण बारवाले.**

मर्यादित जलस्त्रोतांचे व्यवस्थापन हे आपल्यापुढील आणखी एक मोठे आव्हान असून, केवळ शेतीच नव्हे तर अन्य प्रत्येक क्षेत्रासच त्याची झळ बसणार आहे. आता प्रिसिशन फार्मिंग आणि लघुसिंचनासारखी तंत्रज्ञाने वापरून आपल्याला उपलब्ध जलस्त्रोतांचा अगदी काटकसरीने वापर करावा लागणार आहे. त्यासाठी वापरलेल्या पाण्यावर फेरप्रक्रिया (रिसायकलिंग) करून ते पुनः पुन्हा वापरण्याचे तंत्र आपल्याला शिकून घ्यावे लागेल तसेच जे जलस्त्रोत आटत चालले आहेत त्यांना पुन्हा धुमारे (रिचार्जिंग) फोडण्याचे प्रयत्नही करावे लागतील, याला इंटिग्रेटेड इरिगेशन सोल्युशन्स म्हणतात. हे उपाय आपली शेती अधिक फायदेशीर बनवतीलच परंतु त्यामुळे होणारी पाण्याची बचत आपल्या अर्थव्यवस्थेच्या सर्वंकष प्रगतीस खूप मोठा

हे अखेर पूर्णपणे जलसंधारणावर (इरिगेशन) अवलंबून आहे. जी गोष्ट मोजता येत नाही तिचे व्यवस्थापन कदापि करता येत नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आता जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत वापरल्या जाणाऱ्या पाणी व विजेची योग्य किंमत फार महत्त्वाची ठरणार आहे.

यापुढील काळात आपल्याला किमान शहरी परिसरात तरी 'हाय स्पीड नर्सरी', व्हर्टिकल फार्मिंग, हायड्रोपोनिक - एअरोपोनिक यासारख्या नियंत्रित शेतीव्यवस्थांना उत्तेजन द्यावे लागणार आहे. अर्थात जागांच्या किंमती आभाळाला भिडलेल्या असल्याने काही निवडक उद्यमशील शेतकऱ्यांनाच अशी नियंत्रित शेती करणे शक्य आहे. या शेतीमुळे उत्पादन वाढ तर होईलच, परंतु रोगमुक्त रोपण साहित्यही अधिक प्रमाणात उपलब्ध होईल.

सध्या शेतीत राबणाऱ्या श्रमिकांची संख्या घटत चालली असून, त्यांचे वाढते वेतनमान लक्षात घेता यापुढे शक्य असेल त्या प्रत्येक कामात आपल्याला यंत्रांचा वापर करावा लागणार आहे. असे यांत्रिकीकरण झाले आणि जलव्यवस्थापनाची नवनवी तंत्रज्ञाने प्रचारात आली तरच आगामी पिढ्या शेती आणि तिच्यावर आधारित उद्योग व सेवांकडे आकर्षित होतील आणि मग आपल्या साऱ्या कृषीक्षेत्रांचे ज्ञानाच्या आगरांत रुपांतर होईल. ते घडले की आपल्या प्रगतीस सीमाच राहणार नाही आणि मग कृषीक्षेत्राचा विकासदर चार टक्क्यांवर तरी नेण्याचे संकुचित उद्दिष्ट ठेवण्याची वेळही आपल्यावर येणार नाही.

अर्थात या सर्व गोष्टी करणे आपल्याला तेव्हाच शक्य होईल जेव्हा आपले सरकार करआकारणी व कृषी उत्पादनांची किंमत निश्चिती करतांना शेतकऱ्यांच्या हिताची विधायक धोरणे राबविण्यास सर्वोच्च प्राधान्य देईल. कृषीउत्पादनांच्या संबंधातील सर्वच नियम-निर्बंधाचा फेरविचार करून सरकारने आता त्यातील अनिश्चितता व संदिग्धता दूर करणे फार गरजेचे आहे. कृषीक्षेत्राकडे खासगी गुंतवणुकदारांनी आकर्षिक होण्यासाठी योग्य व पूरक वातावरण निर्माण करणे, ही सुद्धा सरकारचीच जबाबदारी आहे. खरे तर, आजघडीस शेती हाच आपल्या देशातील सर्वात मोठा खासगी उद्योग आहे, हे विसरून चालणार नाही. जागतिकीकरण व खासगीकरणासंदर्भात बोलत असताना आपण त्यास शेतीक्षेत्राचा अपवाद का करायचा हेच मला समजू शकत नाही. आपले कृषीमंत्री श्री. शरद पवार नेमके हे जागतिकीकरण व खासगीकरणाचे वारेच कृषीक्षेत्रात आणू पाहात आहेत आणि त्याबद्दल अनेकांचे टीकाप्रहारही सहन करीत आहेत. यापुढील काळात तंत्रज्ञान, किंमत निश्चिती, धोरणात्मक चौकट आणि भांडवल अशा सर्वच बाबतीत बिगर कृषीक्षेत्रांचे सहकार्य व पाठिंबा लाभला तरच आपल्या कृषीक्षेत्राकडून असलेल्या सर्व अपेक्षा पूर्ण होऊ शकतील.

आत्तापर्यंत आपण देशातील कोरडवाहू जमिनी आणि डोंगराळ व दुर्गम परिसरातील शेती विकासाकडे फारसे लक्ष दिलेले नाही, ते तातडीने देण्याची जरुरी आहे. बाजारपेठांचा संस्थात्मक विकास, छोट्या-दुर्बल शेतकऱ्यांचे सबलीकरण, नव्या तंत्रज्ञानाचा अंगिकार, कॉर्पोरेट जगताशी भागीदारी आणि शेतकरी गटांची स्थापना या सर्व गोष्टी प्राधान्याने करणे ही काळाजी गरज असून, त्यातच भारतीय कृषीक्षेत्राच्या अभ्युदयाची बीजे दडलेली आहेत. आमचा 'जैन इरिगेशन' हा उद्योग नेमका हाच विचार घेऊन वाटचाल करीत आहे. शेतकरी आणि समाजाचे अन्य सर्व घटक यांच्यातील परस्पर संवाद व साहचर्य वाढविण्याचे तत्त्वज्ञान हाच तर आमच्या उद्योगाचा पाया आहे. आपल्या जल अन्नसुरक्षेपुढे जी अनेकानेक आव्हाने उभी आहेत, त्यांचे गांभीर्य मी अजिबात कमी लेखत नाही, परंतु आमचे 'जैन इरिगेशन', अन्य उद्योजक आणि तुमच्यासारखे शास्त्रज्ञ व संशोधक या आव्हानांचे रुपांतर निश्चितपणे सुसंधित करतील, असा मला विश्वास आहे. आज येथे आमंत्रित करून आपण माझा जो सन्मान केला, त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद!



Post Regn. No. : MH/MR/South-283/2014-16
Published on 15th of every month posted on 15th, 16th & 17th of every month at Mumbai Patrika Channel Sorting Office Mumbai 400001. RNI No. : MAHMAR / 2008 / 39849




# जैन टिश्युकल्चर डाळींब रोपांचे बुकींग सुरू

- डाळींब उत्पादकाच्यांच्या उदंड प्रतिसादाने चालु वर्षामध्ये मोठ्या प्रमाणात डाळींब रोपांची निर्मीती करीत आहोत.
- गेल्या सात वर्षापासून जैन इरिगेशन डाळींब टिश्युकल्चर रोपांची निर्मीती करीत आहे.
- डाळींब टिश्यु रोपांची वाढ जोमदार, भरगच्च बहार व उत्तम फळांचे सेटींग सशक्त वाढीमुळे अनेक शेतक-यांनी १८ महिन्यातच बहार घेतला.
- फळाचा आकार मोठा, वजन जास्त, आकर्षक रंग, जाड साल यामुळे तीन वर्षापासून जैन टिश्युकल्चर डाळींब रोपांच्या फळांना परदेशात चांगली मागणी.
- गुटी प्रमाणे दोन वर्षे थांबण्याची गरज नाही.
- झाडातील तंतु पेशीपासून रोपांची निर्मिती त्यामुळे १०० टक्के तेल्या व मर मुक्त रोपे फक्त जैन टिश्युकल्चर मुळेच शक्य.
- झाडाच्या खोडापासून तर शेंड्यापर्यंत फळ धारणा.
- तेल्या व मर रोगांच्या प्रसारास आळा घालणारे एकमेव तंत्रज्ञान म्हणजे जैन टिश्युकल्चर डाळींब रोपे.
- भूल थापांना बळी पडू नका - तंत्रज्ञानाची कास धरा.



**भगवा किंमत रू. ३० प्रतिरोप, वाहतूक खर्च वेगळा**

जैन ठिबक
पाणी थेंबानं, पीक जोमानं.

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.

जैन टिश्यूकल्चर
अधिक उत्पादन - अधिकाधिक नफा.

बुकींगसाठी संपर्क - जळगांवः ९४०४९५५३१७, ९४२२७७६७१८, ९४२२७७४९२१, ९४२२७७४९८१, नंदुरबारः ९४२२७७४९७५; पुणेः ९४२२७७४९३३; अहमदनगरः ९४०३६९५९०९ नाशिकः ९४०३७७०६२५; सोलापुरः ९४२२७७४९३२, ९४२२७७६८२६ सांगलीः ९४०३०८०१७२, अमरावतीः ९४०३०८०१३४